**<u>ठळक बातम्या</u>**

- महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपली, उद्या अर्जांची छाननी

- राज्याच्या अनेक भागात युती आणि आघाड्यांचं चित्र अस्पष्ट, राजकीय पक्ष, उमेदवारांमध्ये अखेरपर्यंत संभ्रम

- राज्यातली शिक्षक भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलद्वारे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद राबवणार

- पीएम युवा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या ४३ विजेत्यांची घोषणा, मराठी भाषेसाठी तिघांची निवड

आणि

- नववर्ष स्वागतासाठी उद्या राज्यभरातली हॉटेल, रेस्टॉरंट आणि ऑर्क्रेस्टा बार पहाटे ५ पर्यंत सुरू राहणार

**<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या या अर्जांची छाननी होणार असून २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. ३ जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल, आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल.

आज अखेरच्या दिवसापर्यंत अनेक ठिकाणी युती, आघाडी, उमेदवारी यादी यांचं चित्र स्पष्ट झालं नव्हतं. त्यामुळं राजकीय पक्ष आणि उमेदवारांसह मतदारांमध्ये संभ्रम होता. त्यामुळे अनेकांनी अखेरच्या दिवशी पक्षांतर करुन उमेदवारी पदरात पाडून घेतली. मुंबई आणि आसपासच्या घडामोडींविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

- ***- होल्ड व्हाइस कास्ट- -***

***(मुंबई** महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित होऊन १३७ जागी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार तर ९० जागी शिवसेनेचे उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. रिपब्लिकन पक्षाला जागावाटपातून वगळल्याबद्दल पक्षाध्यक्ष रामदास*

*आठवले यांनी विश्वासघात झाल्याची भावना व्यक्त करत ३९ जागांवर 'मैत्रीपूर्ण लढती'साठी उमेदवार जाहीर केले. आठवले यांचे काही गैरसमज झाले असतील तर ते दूर करू असंही भाजपा नेते आशीष शेलार म्हणाले. दुसरीकडे काँग्रेससोबत आघाडीमधे लढणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला वीस जागांसाठी उमेदवार कमी पडले आहेत. आघाडीमधे त्यांच्या वाट्याला ६२ जागा आल्या होत्या. उमेदवार न मिळाल्यामुळे वीस फॉर्म त्यांनी परत पाठवल्याचं काँग्रेसने नेत्यांनी सांगितलं. तर राष्ट्रवादी काँग्रेसने तीस उमेदवारांची तिसरी यादी आज जाहीर केली.*

***शिवसेना** उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबईसाठी उमेदवारांना एबी फॉर्मचं वाटप सुरु केलं असून अद्याप अंतिम उमेदवार यादी जाहीर केलेली नाही. दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं मुंबईतलं माजी नगरसेवक दांपत्य स्नेहल जाधव आणि सुधीर जाधव यांनी काल एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.*

***दरम्यान,** ज्या प्रभागात समाजवादी पार्टी निवडणूक लढत नाही अशा प्रभागात भाजपाने उमेदवारी नाकारलेल्या उत्तर भारतीय उमेदवाराला आपला पक्ष समर्थन देईल, असं आमदार अबु आझमी यांनी म्हटलं आहे.*

*ठाण्यात शिवसेना ८७ आणि भाजपा ४० जागांवर निवडणूक लढवत असल्याचं शिवसेना खासदार नरेश म्हस्के म्हणाले. नवी मुंबईत शिवसेना १११ जागा आणि वसई विरारमध्ये २७ जागा शिवसेना लढवत असल्याची माहिती त्यांनी दिली. भिवंडी, मीरा-भाईंदरमध्ये भाजपा आणि शिवसेना युती झालेली नाही.*

***पनवेल** महानगरपालिकेसाठी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पक्ष यांची युती जाहीर करण्यात आली आहे. यानुसार भाजपा ७१, शिवसेना ४, राष्ट्रवादी काँग्रेस २, आणि आरपीआय एका जागेवर लढणार आहे.)*

**<><><><><>**

मुंबई महानगर क्षेत्रासारखंच चित्र थोड्याफार फरकानं राज्याच्या इतर भागातही दिसून येतंय. याविषयी अधिक जाणून आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

***(पुण्या**त शिवसेना आणि भारतीय जनता पक्षानं महानगरपालिका निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याचा निर्णय घेतला आहे.*

***नाशिक**मधे भाजप स्वबळावर निवडणूक लढेल, अशी घोषणा मंत्री गिरीश महाजन यांनी आज केली. आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने भाजपामधल्या इच्छुकांची एबी फॉर्म मिळवण्यासाठी चढाओढ लागली होती. एबी फॉर्म देण्यासाठी पक्षाच्या नेत्यांकडून दोन कोटी रुपये घेतले जात असल्याचा आरोप काही जणांनी केला. याची चौकशी केली जाईल, असं महाजन यांनी सांगितलं. दुसरीकडे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस नाशिकसाठी एकत्र आले आहेत.*

*काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे तिन्ही मनसेसोबत एकत्र निवडणूक लढवत आहेत. **मालेगाव**मधे महायुतीच्या तिन्ही घटक पक्षांनी स्वतंत्र लढण्याची घोषणा केली आहे.*

***छत्रपती संभाजीनगर**मधे भाजप आणि शिवसेना स्वतंत्रपणे लढणार आहेत. शिवसेना नेते तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली.*

***नागपूर**मधे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष स्वबळावर लढणार असून भाजपा आणि शिवसेना यांची युती झाली आहे. तसंच राष्ट्रवादी काँग्रेसनेही स्वबळाचा नारा दिला आहे.*

***चंद्रपूर** महानगरपालिकेसाठी भाजपा आणि शिवसेनेची युती झाली असून राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. काँग्रेसने जनविकास सेना पक्षाशी आघाडी केली असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र आले आहेत. मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष स्वबळावर मैदानात उतरणार आहेत.*

***कोल्हापूर**मध्ये महायुतीमध्ये एकमत झालं असून ८१ पैकी भाजपा ३६ जागांवर निवडणूक लढवणार असून शिवसेना ३०, तर राष्ट्रवादी काँग्रेसला १५ जागा लढवणार आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीमध्ये फूट पडली असून काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट एकत्र आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं तिसऱ्या आघाडीसोबत हातमिळवणी केली आहे.*

***धुळे** महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसची युती झाली आहे. तर भाजपा ६३ जागा स्वबळावर लढवणार आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस ३०, शिवसेना ३० आणि राष्ट्रवादी काँग्रेस १४ जागा लढवणार आहे.*

*नांदेड महापालिका निवडणुकीत महायुतीसह महाविकास आघाडीचीही अद्याप घोषणा झाली नाही.*

***लातूर**मध्येही भाजपानं स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. आधी राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर निवडणूक लढवण्याचा निर्णय भाजपानं घेतला होता.*

*जालना महानगरपालिका निवडणुकीतही भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने स्वबळाचा नारा दिला आहे.*

***जळगाव** महानगरपालिका निवडणुकीत मात्र महायुतीच्या घटक पक्षांचं मनोमिलन झालं असून तिन्ही पक्षांनी युती जाहीर केली आहे.)*

<><><><><>

नागपूर महानगर पालिकेच्या निवडणुकीत भाजपा आणि शिवसेनेत युती झाली आहे. भाजपानं १४३ आणि शिवसेनेनं ८ उमेदवार दिले आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षही एकत्र निवडणूक लढवत आहेत.

<><><><><>

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी आम आदमी पक्षानं आज आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. 'केजरीवालची गॅरंटी' याअंतर्गत मोफत आणि २४ तास पाणीपुरवठा, २०० युनिट्सपर्यंत मोफत वीज, उत्तम दर्जाचं मोफत शिक्षण आणि आरोग्य सुविधा इत्यादी देण्याचं वचन आपनं दिलं आहे. या निवडणुकीत आम आदमी पक्षानं ७५ उमेदवार दिले आहेत.

<><><><><>

राज्यातली शिक्षक भरती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सोपवण्याचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या सुकाणू समितीच्या मार्गदर्शनाखाली हे कामकाज होईल. परीक्षा परिषदेचे अध्यक्ष हे या समितीचे अध्यक्ष असतील तर परीक्षा परिषदेचे आयुक्त सदस्य सचिव असतील. याशिवाय इतर ३ सदस्य या समितीत असतील. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून ही परीक्षा परिषद हे काम करेल. सध्या TET अर्थात शिक्षक पात्रता परीक्षा या परिषदेकडून घेतली जाते.

<><><><><>

युवा लेखकांना मार्गदर्शन करण्यासाठी पीएम युवा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या विजेत्यांची घोषणा आज झाली. इंग्रजीसह एकूण २२ भारतीय भाषांमधल्या ४३ विजेत्यांचा यात समावेश आहे. मराठीसाठी दिव्यांशू सिंग, अंबादास मेव्हाणकर आणि प्रसाद जाधव या लेखकांचा यात समावेश आहे. सर्व विजेत्यांच्या संकल्पनांचं पुस्तकात रुपांतर करण्यासाठी या लेखकांना सहा महिन्यांचं मार्गदर्शन आणि दर महिन्याला ५० हजारांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. याशिवाय पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आयुष्यभरासाठी १० टक्के रॉयल्टी दिली जाणार आहे.

<><><><><>

नववर्षानिमित्त उद्या राज्यातल्या खाद्यागृह, हॉटेल, रेस्टॉरंट आणि ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनांना दुसऱ्या दिवशी पहाटे पाचपर्यंत आपल्या आस्थापना खुल्या ठेवता येतील. दरवर्षी या आस्थापनांकडून येणारी मागणी आणि शासनाकडून मंजूरी यात दरवर्षी होणारा कालापव्यय लक्षात घेता ही परवानगी दरवर्षी डिसेंबरच्या २४, २५ आणि ३१ या तारखांना देण्यात आल्याचं राज्यशासनानं या पत्रकात स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

दिव्यांगांसाठी असलेल्या राज्यातल्या शाळां तसंच कार्यशाळांमधल्या अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासाठी सर्वसमावेशक आणि कालबद्ध कार्यपद्धती निश्चित केली असल्याची माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली. अशा कर्मचाऱ्यांना समान वेतनश्रेणीतील समकक्ष पदावर नियुक्ती देण्यात येईल तसंच प्रथम दिव्यांग कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल, असंही मुंढे यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत आणि श्रीलंकेच्या महिला क्रिकेट संघांदरम्यान पाचवा आणि शेवटचा टी-ट्वेंटी सामना तिरुवनंतपुरम इथं सुरू आहे. श्रीलंकेच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं, तेव्हा भारताच्या एका षटकात बिनबाद ५ धावा झाल्या होत्या.

या मालिकेत भारताकडे सध्या ४-० अशी घसघशीत आघाडी आहे आणि हा सामना जिंकून श्रीलंकेला व्हाईटवॉश देण्याचं भारताचं लक्ष्य आहे.

//<><><><><>//